संजय म. फोपे
एम.सी.एच.आय. मेकर भवन–२,
४ था माळा,
१८, विठ्ठलदास ठक्करसिंग मार्ग,
न्यु मरिन लाईन्स,
मुंबई–४०० ०२०.
दिनांक: २१/०१/२०१४

प्रति,

मा. उपजिल्हाधिकारी,
गौण खनिज उत्खनन विभाग,
मुंबई उपनगरजिल्हा यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, १०वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई–४०० ०५१.

382 21/1/14 1590 लिपिक जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा

विषय: गौण खनिज संदर्भात दि. ३०/१२/२०१३ रोजी जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी तसेच गौण खनिज अधिकारी यांच्याशी झालेल्या मिटींग संदर्भात.

महोदय,

वर उल्लेख केल्या प्रमाणे दि. ३०/१२/२०१३ रोजी मिटींग मध्ये झालेल्या गौण खनिज संदर्भात शासनास आपल्याकडून जो पत्र व्यवहार झाला आहे, त्याची एक प्रत देण्यात यावी.

तरी मा. महोदयांना विनंती करण्यात येते की, मला वरील विषयी नमुद गौण खनिज संदर्भात दि. ३०/१२/२०१३ रोजी जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी तसेच गौण खनिज अधिकारी यांच्याशी झालेल्या मिटींग संदर्भात जो पत्र व्यवहार झाला आहे त्याची प्रत देण्यात यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

21/01/14

( संजय म. फोपे )
एम.सी.एच.आय.
(लायजनींग असिसटंट)

# अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पुर्व), मुंबई -५१.
दुरध्वनी क्र.:- २६४००७६४ फॅक्स क्र.:-६५५६८०५ ईमेल आयडी :-collrmsd@yahoo.com

क्र.अ.जि./डेस्क-४/गौखनि/को.के./२०१३
दि.१६/०१/२०१४.

प्रति
मा. उपसचिव
महसुल व वन विभाग (ख शाखा)
वर्ल्ड ट्रेड सेंटर -१, कफ परेड, कुलाबा
मुंबई - ४०० ००५

**विषय:- रिट पिटीशन क्र. ६७०२/२०११.**
**महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हाऊसिंग विरुध्द**
**महाराष्ट्र शासन व इतर.**
**संदर्भ :-१) आपले पत्र क्र. गौखनि १०/१०११/प्र.क्र.६१८/ख,**
**दिनांक १७/११/२०१२**
**२)एम.सी. एच.आय. यांचे कडिल दिनांक १८/१२/२०१३ चे पत्र**

माननीय महोदय,

महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसींग इंडस्ट्रीज (MCHI) यांनी दि. **१८/१२/२०१३** रोजी या कार्यालयाकडे मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन नं. **६७०२/२०११** मध्ये दि. **०५/०९/२०११** रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे मुंबई उपनगर जिल्हयामध्ये इमारतीच्या बांधकामासाठी व भुखंडाचा विकास करताना विकासक करीत असलेल्या उत्खननावर गौणखनिजाच्या स्वामीत्वधनाची आकारणी करू नये या बाबत निवेदन दिलेले आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसींग इंडस्ट्रीज (MCHI) या संस्थेने त्यांच्या अर्जासोबत **रिट पिटीशन नं. ६७०२/२०११** मधील आदेश दि. ०५/०९/२०११ ची प्रत व सोबत महसुल व वन विभागाकडील पत्र दि. **१७/११/२०११** ची प्रत सोबत जोडली आहे.

मा. उच्च न्या. मुंबई यांचे कडील रिट पिटीशन नं. ६७०२/२०११ मधील आदेश दि. ०५/०९/२०११ चा आदेशाचे अवलोकन करता पुढील बाबी स्पष्ट होतात.

१. **रिट पिटीशन नं. ६७०२/२०११** व **रिट पिटीशन नं. ७३९०/२०१०** या दोन्ही पिटीशन मधील अर्जदारांची मागणी सारखी ( Identical ) आहे.

२. वर नमुद दोन्ही पिटीशन मधील मागणी सारखी (Identical) असल्याने अंतरीम आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

३. **रिट पिटीशन ६७०२/२०११ व रिट पिटीशन नं. ७३९०/२०१०** या दोन्ही रिट पिटीशन महसुल अधिकाऱ्यांनी जमीन विकासकास **महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम** ४८(७) अन्वये नोटीस (दंडात्मक ) बजावल्यानंतर त्या कावाईच्या विरोधात दाखल करण्यात आल्या आहेत.

४. **रिट पिटीशन ६७०२/११ व रिट पिटीशन ७३९०/१०** या दोन्ही रिट पिटीशन मध्ये **महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम** ४८(७) खाली सुरु केलेली कार्यवाहीस स्थगिती / थांबविणेबाबत prayer करणेत आली आहे.

५. मा. मुंबई उच्च न्यायालयाकडील **रिट पिटीशन नं. ७८५/२००८ मध्ये दि. ०८/१०/२०१०** रोजी पारीत झालेल्या आदेशात मा. उच्च न्यायालयाने **महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम** ४८(७) खाली महसुल अधिकाऱ्याने काढलेली नोटीस Valid ठरविली होती. सदर आदेशाविरोधात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये Special Leave Peition ३३००२/२०११ दाखल करणेत आली व या Special Leave Peition मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने अंतरीम आदेश पारीत केला आहे.

६. रिट पिटीशन ७८५/२००८, ७३९०/२०१० व ६७०२/२०११ पाहता हया सर्व याचीका **महाराष्ट्र जमिन अधिनियम १९६६ चे कलम** ४८(७) अन्वये सुरु करणेत आलेल्या कारवाई विरोधात दाखल झालेल्या असु सर्व याचीकांमध्ये अर्जदारांची विनंती **महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम** ४८(७) खाली सु केलेल्या कार्यवाहीस स्थगिती देणेबाबत आहे.

७. मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या विविध याचीकामध्ये **मुंबई गौणखनिज अधिनियम १९५५** खाली उत्खननाचा परवाना देण्याची कार्यवाहीस हरकत घेतलेली दिसुन येत नाही.

८. तसेच मा. उच्च न्यायालयाने कोणत्याही आदेशात **मुंबई गौणखनिज अधिनियम १९५५** खाली जमीनीचा गौण खनिज उत्खनन परवाना देण्यात येऊ नये असे आदेशीत केलेले नाही किंवा या अधिनियमाबाबत भाष्य केलेले नाही.

९. अर्जदार महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसींग इंडस्ट्रीज (MCHI) यांचे दि. १८/१२/२०१३ चे निवेदनावर परिच्छेद -१ मध्ये देखील **महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम** ४८(७) खाली उत्खननावर स्वामीत्वधन भरण्याची आवश्यकता नाही असे नमुद केले आहे. अर्जदारांचे निवेदनात मुंबई गौणखनिज उत्खनन अधिनियम १९५५ चा कोणताही उल्लेख केलेला दिसत नाही.

शासनाचे नविन धोरण महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन ( विकास व विनियमन ) नियम २०१३ मध्ये इमारतीचे बांधकाम व जमिनीचा विकास करताना कराव्या लागणाऱ्या उत्खननात स्वामित्वधन भरून परवाना घेण्याची आवश्य ता नसले बाबत नमुद केलेले नाही किंवा तसा शासन निर्णय अस्तित्वात नाही.

तथापि मुंबई उपनगर जिल्हयात सुरू असलेल्या विकास कामांना बृहन्मुंबई महानगर पालिका,झोपडपट्टी विकास प्राधिकरण,भारतीय विमान पतन प्राधिकरण, एम.एम.आर.डी.सी. इत्यादी सारख्या विकास प्राधिकरणा अंतर्गत तसेच इतर स्थानिक बिल्डर्स व डेव्हलपर्स यांचेतर्फे करण्यात येणाऱ्या स्थापत्यविषयक कामांतर्गत पाया, बेसमेंट खोदताना साधीमाती ,मुरूम, दगड इत्यादी गौण खनिजाचे मोठया प्रमाणावर उत्खनन होते अशा स्वरुपाच्या खनिजावर नियमान्वये स्वामित्वधन व भुपृष्ठ भाटक भाडे आकारणी करणे क्रमप्राप्त आहे.

तसेच **महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन** (विकास व विनियमन ) नियम २०१३ अन्वये मधील तरतुदी विचारात घेता या कार्यालयात प्राप्त आवेदनानुसार कार्यवाही करून स्वामित्वधन,भुपृष्ठ भाटकाची वसुली करुन परवाना दिला जातो.त्यामुळे शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेले उद्दीष्ट प्राप्त करता येते.सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात निश्चित केलेल्या ३४ कोटी उद्दीष्टापेक्षा ४१.६०कोटी एवढा वसुल केला होता,तरी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी ५० कोटी उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे.तथापि, एम.सी.एच.आय.मार्फत वेळोवेळी पत्रव्यवहार करून मोठमोठया प्रकल्पांतर्गत उत्पादित होणाऱ्या गौणखनिजावर प्रस्थावित आकारणी होणाऱ्या स्वामित्वधन व भुपृष्ठ भाटक शासनास जमा करण्यास विरोध करीत आहेत.त्यामुळे महसुल वसुलीच्या कामास आवश्यक ती गती येत नाही . त्यामुळे आजपावेतो २४.४१ कोटी एवढीच वसुली झालेली आहे.

वर उल्लेख केलेल्या विविध दाव्यांच्या संदर्भात मा. न्यायालयाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशांचे अवलोकन करता मा.न्यायालयाने **महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७)** अन्वये करण्यात येणाऱ्या दंडनिय कारवाईस स्थगिती दिलेली आहे, तथापि गौण खनिज उत्खननास परवाना दिल्यास न्यायालयाच्या आदेशास कुठलिही बाधा येत नाही. अशी या कार्यालयाची धारणा आहे.

तरी, याद्वारे आपणास विनंती करण्यात येते की मा.सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाच्या निवाडयाचे तसेच कायदेशीर तरतुदींचे अवलोकन करुन आमची धारणा पक्की करावी किंवा योग्य ते मार्गदर्शन / आदेश व्हावेत ही विनंती.

अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा